# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, (दक्षिण कक्ष) बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७, २७५७८४०१
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.
वेबसाईट : mahamjp.com

क्र.मजीप्रा/२०१२/सभा-१२६/(१२२)/आ.४ दिनांक : ३१.१२.२०१२

प्रति,
मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

विषय : दि.२१.११.२०१२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२६व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गुरुवार दि.२१.११.२०१२ रोजी झालेल्या १२६व्या सभेचे इतिवृत्त आपले माहितीसाठी यासोबत सादर करण्यांत येत आहे.

सोबत : १२६ व्या सभेचे इतिवृत्त
पृ.क्र. १ ते ९

आपला विश्वासू,

(पंजाबराव वानखडे)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

(२)

प्रत :

१. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. जलव्यवस्थापन, ठाणे,/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे, /अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक /नागरी व ग्रामीण योजना, ठाणे /मध्यवर्ती नियोजन, मित्तल टॉवर्स, मुंबई.

आपल्या संबंधित असलेल्या कार्यक्रम बाबींवर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

2. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई,

वित्त व लेखा शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.४, ६ व ७ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

3. अधीक्षक अभियंता (समन्वय) म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.३,६,७ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

4. अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) म.जी.प्रा. ठाणे/नागपूर.

5. उप मुख्य लेखा अधिकारी (१) व (२) मजीप्रा., नवी मुंबई.

6. उप सचिव, पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,

7. आस्थापना अधिकारी (दक्षता) मजीप्रा, नवी मुंबई,

आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१, २, ५ आयत्या वेळेची का.बा. क्र.१ व आयत्या वेळेची चर्चा यावर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

8. प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई,

9. कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

10. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष अधिकारी (आस्थापना- )/कार्यासन अधिकारी (आ- ) यांच्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

आपल्या कार्यासनाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१,२,५ आयत्या वेळेची का.बा.क्र.१ व आयत्या वेळेची चर्चा यावर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

11. सर्व लेखा अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

12. व्यवस्थापक, स्थावर मालमत्ता कक्ष (आ-९) सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व संबंधितांनी कार्यपूर्ती अहवाल दि.१० जानेवारी २०१३ पर्यत सादर करावा.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२६ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १२६ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.लक्ष्मण ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि.२१/११/२०१२ रोजी दुपारी २.००वाजता संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते:-

१. मा.ना.श्री. लक्ष्मण ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.ना.श्री.रणजित कांबळे, मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व.विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
५. मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांच्या वतीने उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
६. राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई -३२.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते:-

१. श्री.पंजाबराव वानखडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा, मुंबई.
२. श्री.हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागरी व ग्रामीण योजना, ठाणे.
३. श्री.व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे.
४. श्री.एम.ए.जवांदे, मुख्य अभियंता (प्रभारी) म.जी.प्रा., जलव्यवस्थापन, ठाणे.
५. श्री.सुधाकर डांगे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई,
६. श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (समन्वय) म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
७. श्री.बी.एस.पाटील, उप मुख्य लेखाधिकारी(१), म.जी.प्रा., मुंबई

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१:**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२४ व्या व १२५व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

दि.१४.८.२०१२ व दि.२०.९.२०१२ रोजी संपन्न झालेल्या अनुक्रमे १२४व्या व १२५व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

27/12

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

(४)

**कार्यक्रम बाब क्र.२:**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२४व्या व १२५व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.१४.८.२०१२ व दि.२०.९.२०१२ रोजी संपन्न झालेल्या अनुक्रमे १२४व्या व १२५व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास सविस्तरपणे अवगत केले. याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत आले.

**कार्यक्रम बाब क्र.३:**

**विषय:** बल्लारपुर पाणी पुरवठा योजना, ता.बल्लारपुर, जि.चंद्रपूर योजना नगर परिषदेला हस्तांतरीत करण्याबाबत.

सदर विषयाबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

बल्लारपूर पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत करुन घेण्यासाठी योजनेवरील कार्यरत ५१ कर्मचाऱ्यापैकी फक्त १५ कर्मचारी हस्तांतरीत करुन घेणेस तयार आहे. त्यामुळे उर्वरीत कर्मचा-यांचे दायित्व जसे निवृत्त वेतन इत्यादी म.जी.प्रा.वर येईल. त्याचप्रमाणे नगरपरिषदेकडे पाणीपट्टीपोटी रु.५८७.८४ लक्ष, ग्राहकांकडील रु.१९९३.०९ लक्ष त्याचप्रमाणे योजनेसाठी घेतलेल्या कर्जाची रु.७५४.८६ लक्ष नगरपरिषदेकडे प्रलंबित आहेत. त्यामुळे सदर प्रलंबित थकबाकी म.जी.प्रा.स अदा केल्यास व सर्व ५१ कर्मचारी हस्तांतरीत करुन घेतल्यास योजना नगरपरिषदेस हस्तांतरीत करता येईल असे मा.संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावाबाबत चर्चा झाली असता, मा.राज्यमंत्री महोदयांनी, सदरची योजना उपरोक्त बाबींची पूर्तता होत असल्यास, हस्तांतरीत करण्यात यावी असे नमूद केले असता सदर बाबीस संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, बल्लारपूर पाणी पुरवठा योजना पुढील नमूद अटींच्या अधीन राहून सुयोग्य असा करार करुन बल्लारपूर नगरपरिषदेस दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरित करण्यात यावी.

अटी :- १) नगर परिषद बल्लारपूर कडील पाणीपट्टी पोटी असलेली थकबाकी रु.५८७.८४ लक्ष मजीप्रास प्रथम एकरकमी अदा करण्यात यावी. तसेच इतर ग्राहकांची पाणीपट्टी थकबाकी रु.१९९३.०९ लक्ष ही पुढील ३ वर्षामध्ये समान हप्त्यात अदा करावी.

27/12

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

कार्यक्रम बाब क्र.५:

विषय : मजीप्राच्या १२४व्या बैठकीतील निर्णयानुसार सादर.
महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांनी स्वत: अथवा कुटूंबीयांवर गंभीर आजारावर शासनमान्य/खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या उपचारावरील वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीस "विशेष बाब" म्हणून मंजूरी देणे बाबत.

या प्रकरणी चर्चा करुन मा.सदस्य सचिव यांनी असे स्पष्ट केले की, श्री.महाजन, उप अभियंता (यां) यांचा मुलगा कु.प्रतिक यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्यामुळे त्याच्या किडनी प्रत्यारोपनासाठी वोक्हार्ट हॉस्पीटल नागपूर येथे डायलेसीस व इतर औषधोपचारासाठी सन २०११ या वर्षात झालेल्या खर्चाचे देयक **विशेष बाब** म्हणून मंजुर करण्याचा प्रस्ताव मा.संचालक मंडळाच्या दि.१४.८.२०१२ च्या १२४ व्या सभेमध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. मजीप्रा.मध्ये अशा प्रकारची किती प्रकरणे आहेत याबाबतची एकत्रित माहिती पुढील बैठकीमध्ये मान्यतेसाठी सादर करण्याचा मा.संचालक मंडळाने निर्णय घेण्यात आला होता.

त्यानुसार माहिती काढली असता मजीप्रामध्ये आजमितीला श्री. महाजन, उप अभियंता यांचे प्रकरण वगळता अजून ५ प्रकरणे असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले. सदरची प्रकरणे ही सन २००७ ते २००८ या वर्षातील असल्याचे सांगितले. दि.१.४.२०१२ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ लागू करण्यात आले. आता विषयांकित प्रकरणातील रुग्णालयांची नांवे शासनाच्या मान्यता प्राप्त खाजगी रुग्णालयाच्या यादीत समाविष्ट झाली आहेत. श्री.महाजन, उप अभियंता यांचे प्रकरण सन २०११ मधील असल्यामुळे **'एक विशेष बाब'** म्हणून मंजुर करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच उर्वरित प्रकरणे दि.३१.३.२०१२ चे पूर्वीचे आहेत, ही ४ ते ५ वर्षापूर्वीची असल्यामुळे आजमितीला श्री. व्ही.एम.महाजन, उ.अ. यांचे प्रकरण **विशेष बाब** म्हणून मंजुर करावे. या बाबत चर्चा होऊन प्राधिकरणाच्या १२४ व्या बैठकीमध्ये मान्यतेसाठी सादर केलेनुसार श्री. व्ही.एम.महाजन, उप अभि.(यां) यांच्या मुलाच्या किडनी प्रत्यारोपनासाठीच्या खर्चास मान्यता देण्याबाबत चर्चा होऊन सदर कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात येवून खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव:**

असा ठराव करण्यात येतो की, श्री. व्ही.एम.महाजन, उप अभियंता यांचा मुलगा चि.प्रतिक याच्या किडनी प्रत्यारोपनासंबंधी वोक्हार्ट हॉस्पीटल, नागपूर येथे डायलिसीस व इतर औषधोपचारावर झालेल्या खर्चाची प्रतीपूर्ती करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

२)योजनेकरीता घेतलेल्या कर्जाची थकबाकी रु.७५४.८६ लक्ष परतफेड करण्याचा कालबध्द कार्यक्रम द्यावा व उर्वरित कर्जाची यापुढील परतफेड नगरपरिषदेने नियमितपणे करावी.

३) योजना हस्तांतरित करतांना योजनेवरील कार्यरत संपूर्ण कर्मचारी वर्ग हस्तांतरित करुन घ्यावे.

४)योजनेमध्ये ज्या ग्राहकासोबत मजीप्राचा करारनामा झालेला आहे. त्यांना करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार भविष्यात पाणी पुरवठा करण्याचे बंधन नगरपरिषद बल्लारपूरवर राहील.

उपरोक्त ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४:**

**विषय:** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत.

शासन निर्णय क्र.पीएसयु.१००५/सीआर.२६/पीएसयु/मंत्रालय, मुंबई-३२, दि.१३.३.२००६ व शासन निर्णय क्र.पीएसयु.१००५/सीआर.२६/पीएसयु/मंत्रालय, मुबई-३२, दि.२२.३.२००६ अन्वये सुधारीत मार्गदर्शक तत्वे निर्गमित झाली आहेत. यानुसार अल्प मुदतीच्या गुंतवणूक सदस्य सचिव यांच्या मान्यतेने केल्या जातात व शासन निर्णयातील सूचनेनुसार अशा अल्प मुदतीच्या गुंतवणूकी संचालक मंडळाच्या प्रत्येक बैठकीत मान्यतेसाठी सादर केल्या जातात. प्रस्तृत कार्यक्रम बाबीं मध्ये ७६ ते १९५ दिवस कालावधीसाठी केलेल्या गुंतवणूकीचे प्रस्ताव असनू ते सदस्य सचिव स्तरावर मान्यतेने केलेले आहेत. केलेल्या गुंतवणूकीचे प्रस्ताव शासन निर्णयानुसार असल्याने प्रस्ताव मान्य करण्यात यावा. असे सदस्य सचिव यांनी नमुद केले. चर्चेअंती पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यांत येतो की, दि.१६.९.२०१२ ते दि.१०.११.२०१२ या कालावधीत केलेल्या अल्प मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यांत येत आहे.

27/12

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.६:** संरक्षण पाणी पुरवठा केंद्र साकोरे (मिग), ता. निफाड, जि. नाशिक पालखेड धरणापासून जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत थेटपाईपलाईन टाकणे.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

संरक्षण पाणी पुरवठा केंद्र, साकोरा येथे पालखेड धरणातून थेट पाईप लाईनव्दारे गुरुत्वाने पाणी आणण्यासाठी Deffered Payment धर्तीवर निविदा मागवून आवश्यक कामे करण्याचा प्रस्ताव यापूर्वी दि.२८-६-२०११ रोजी संपन्न झालेल्या मा.संचालक मंडळाच्या १२१ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येऊन, ज्या पध्दतीने निविदा मागविण्यात येणार आहेत, त्याच्या प्रारुप मसुदा पुढील बैठकीत सादर करुन अंतिम मान्यता प्रदान करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले होते.

सदर निर्देशानुसार प्रस्तावाची फेरतपासणी केली असता, Deffered Payment धर्तीवर निविदा मागवून आवश्यक कामे केल्यास आर्थिक दृष्टया म.जी.प्रा.स किफायतशीर ठरणार नाही असे दिसून आले. त्याऐवजी बी-१ पध्दतीने निविदा मागवून व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील Funds for Augmentation & Improvement to water works या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या रु.३.३० कोटी व उर्वरित निधी General Reserve किंवा Depreciation Fund शिर्षामधून केल्यास आर्थिकदृष्टया म.जी.प्रा.च्या हिताचे आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी अवगत केले.

त्यानुसार बैठकीत चर्चा होऊन, अंदाजित रु.२१.६६ कोटी किंमतीची कामे नियमित बी-१ निविदा मागवून करण्यास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव :

असा ठराव करण्यांत येतो की, पालखेड धरणाच्या उजव्या तट कालव्यातील विमोचकाव्दारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या संरक्षण (साकोरे) पाणी पुरवठा केंद्राच्या जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत थेट १०कि.मी. लांबीची डी.आय.गुरुत्ववाहिनी टाकण्याच्या रु.२१.६६ कोटी किंमतीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार सदरची कामे मजीप्रामार्फत बी-१ पध्दतीने निविदा मागवून व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील Funds for Augmentation & Improvement to water works या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या रु.३.३० कोटी व उर्वरित निधी General Reserve किंवा Depreciation Fund शिर्षामधून करण्यासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच मजीप्राच्या निधीचा किफायतशीर वापर करण्याच्या दृष्टीने बँकेकडून कर्ज उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

27/12

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

(५)

(८)

**कार्यक्रम बाब क्र.७:**

**विषय :** MMRDA च्या रेन्टल हाऊसिंग स्कीमसाठी पाणी पुरवठा केंद्र, करण्याकरीत्ता प्रकल्प हाती घेणे व त्याचाच भाग म्हणून रोहींजण येथील प्रस्तावित रेन्टल हाऊसिंगसाठी पाणी पुरवठा करण्याबाबत.

सदर कार्यक्रमबाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यात रेन्टल हाऊसिंग योजना प्रस्तावित असून, त्यासाठी ८५ द.ल.लि प्रतिदिन इतक्या पाण्याची आवश्यकता आहे. सदर पाण्याची गरज महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने भागवावी, अशी अपेक्षा मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने व्यक्त करुन तसा सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची विनंती दि. १.१०.२०१२ च्या आंग्ल पत्राद्वारे मजीप्राकडे केली आहे. त्याचबरोबर तसे करारनाम्याचे प्रारुप, पाण्याच्या वितरणासाठीचे धोरण, पाण्याची देयके व त्याची वसुली इ. बाबतचे अभिप्रायही देण्याची विनंती केली आहे.त्याचप्रमाणे या प्रकल्पाअंतर्गत रोहिंजण गावात तळोजा औद्योगिक वसाहतीनजिक प्रकल्प प्रस्तावित असून मे.अधिराज कंन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांनी त्यांच्या प्रकल्पासाठी ४० द.ल.लि. पाणी पुरवठा म.जी.प्रा.ने करण्याची विनंती केली आहे व त्यानुसार सुसाध्यता अहवाल देण्याबाबतही कळविले आहे.

रोहिंजणसाठीच्या या प्रकल्पासाठी तात्काळ म्हणून सध्या ५ द.ल.लि. इतके पाणी म.जी.प्रा.च्या अस्तित्वातील योजनेव्दारे देता येईल व ४० द.ल.लि. पाणी पुरवठा करण्यासाठी सुमारे २९.१६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या प्रस्तावित रेन्टल हाऊसिंग प्रकल्पासाठी ८५ द.ल.लि. पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी म.जी.प्रा.ने अहवाल तयार केला असून, त्याची अंदाजित किंमत रु.१८०.१० कोटी ढोबळ इतकी आहे.

सदर प्रस्ताव मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडे पाठविण्यापूर्वी मजीप्रा व MMRDA यांच्या दरम्यान करावयाच्या करारनाम्याचे प्रारुप, प्रकल्पासाठी MMRDA कडून वित्तीय सहाय्य उपलब्ध होण्यासाठीचे विविध पर्याय निश्चित करणे, पाण्याच्या वितरणासाठीचे धोरण, पाण्याची देयके व त्याची वसुली इ. बाबत सदस्य सचिव, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी तसेच मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन यांनी एकत्रित चर्चा करुन सुयोग्य प्रस्ताव तयार करणे आवश्यक असून या कार्यवाहीस मा.संचालक मंडळाची मान्यता आवश्यक असल्याने, प्रस्ताव कार्यक्रमबाबीव्दारे मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी अवगत केले.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन प्रस्तावित केल्यानुसार मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

ठराव :

१. मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या प्रस्तावित रेन्टल हाऊसिंग प्रकल्पासाठी ८५ द.ल.लि. पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी मजीप्राने तयार केलेल्या रु.१८०.१० कोटी ढोबळ खर्चाचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यापुर्वी मजीप्रा व MMRDA यांच्या दरम्यान करावयाच्या करारनाम्याचे प्रारुप, प्रकल्पासाठी MMRDA कडून वित्तीय सहाय्य उपलब्ध होण्यासाठीचे विविध पर्याय निश्चित करणे, पाण्याच्या वितरणासाठीचे धोरण, पाण्याची देयके व त्याची वसुली इ. बाबत सदस्य सचिव, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी तसेच मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन यांनी एकत्रित चर्चा करुन सुयोग्य प्रस्ताव तयार करुन योजना प्रस्तावासह MMRDA यांना सादर करावा.

२. दरम्यानच्या काळात कळंबोली येथील जलवाहिनीच्या शेवटच्या टोकापासून ते प्रस्तावित रोहिंजन येथील रेंन्टल हौसिंग योजनेसाठी ९ कि.मी. जलवाहिनी टाकुन सद्य:स्थितीत ४ ते ५ द.ल.लि. पाणी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यांत येत आहे. मात्र भविष्यात सन २०१८ च्या मागणीनुसार या प्रकल्पास एकूण ४० द.ल.लि. इतकी मागणी पुर्ण करण्यासाठी MMRDA कडे सादर करावयाच्या २३६ द.ल.लि. क्षमतेच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त होणे वा शाश्वती मिळणे जरुरीचे असल्याने, ती प्राप्त होण्यापुर्वी प्रत्यक्षात काम हाती घेण्यात येऊ नये.

३. रोहिंजण येथील काम पूर्ण ठेव तत्वावर हाती घेऊन पूर्ण करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत असून, आवश्यक तो निधी प्रथम प्राप्त करुन घेणे, त्याचप्रमाणे भविष्यात आकारावयाची पाणीपट्टी, सन २०१८ अखेर उपलब्ध करुन द्यावयाचे ४० द.ल.लि. पाणी इ. बाबत आवश्यक अटी व शर्तीचा समावेश असलेला आवश्यक तो करारनामा सक्षम अधिका-यांनी मंजूर करावा.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे

**आयत्या वेळच्या कार्यक्रम बाबी.**

**कार्यक्रम बाब क्र.१**

विषय: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील तांत्रिक अधिका-यांची स्वेच्छा निवृत्तीची विनंती प्रकरणे तुर्त थांबविणे बाबत.

सध्या तांत्रिक अधिकारी बऱ्याच प्रमाणात स्वेच्छा निवृत्ती घेत आहेत. त्यामुळे तांत्रिक (अभियांत्रिकी) अधिकाऱ्यांची संख्या दिवसेदिवस कमी होत आहे. परिणामी पाणी पुरवठा योजनांच्या कामावर परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच मजीप्रावर संबंधीत अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतन व उपदान, रजा रोखीकरण, निवृत्ती वेतन विक्री इत्यादीचा आर्थीक भार पडतो. त्यामुळे उर्वरित निवृत्तीधारक अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा करणे कठीण जात आहे. सद्यस्थितीत

| | |
|---|---|
| **मा.अध्यक्ष तथा मंत्री**<br>**पाणी पुरवठा व स्वच्छता** | **सदस्य सचिव**<br>**म.जी.प्रा.** |

तांत्रिक अधिकारी यांची स्वेच्छा निवृत्तीची विनंती यापुढे मान्य करण्यात येवू नये. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन प्रस्तावित केल्यानुसार संचालक मंडळाची मान्यता घेऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, मजीप्रातील तांत्रिक (अभियांत्रिकी) अधिकाऱ्यांची गरज लक्षात घेता मजीप्रातील तांत्रिक अधिका-यांच्या स्वेच्छा निवृत्तीची विनंती यापुढे पुढील आदेशापर्यंत मान्य करण्यांत येवू नये. या बाबीस संचालक मंडळ मान्यता देत आहे. या बाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.२**

**विषय:** औरंगाबाद शहर पाणी पुरवठा व्यवस्थेच्या संचालना संदर्भात खाजगी संस्थेबरोबर Joint Venture करण्याबाबत.

सदर कार्यक्रमबाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

औरंगाबाद म.न.पा.ने शहराच्या पाणी पुरवठा व्यवस्था संचालनासाठी औरंगाबाद सिटी वॉटर युटीलीटी कं.लि. ची नियुक्ती केली असून, त्यामध्ये Essel Utilities Ltd. SPML Infra Ltd./SPML Utilities Ltd., VA Tech Wabag Ltd. आणि National Water & Sewerage Corporation, Uganda हे चार भागीदार आहेत.

यापैकी Essel Utilities Ltd. या प्रमुख भागीदारांनी सदर औरंगाबाद सिटी वॉटर युटीलीटी कं.लि. मध्ये म.जी.प्रा.चा सहभाग मिळावा अशी विनंती केली होती, त्यानुसार म.जी.प्रा.चे अभियंते/अनुभवी कर्मचारी थेट प्रतिनियुक्तीवर देण्याची मागणी केली होती. तथापि सदर मागणी मान्य करता येणार नसल्याचे त्यांना कळविण्यात आले आहे. त्याऐवजी सदर कंपनी बरोबर संपूर्ण कामकाजासाठी जॉईंट व्हेंचर करार करता येईल असे चर्चे मध्ये स्पष्ट केल्यानंतर यामध्ये म.जी.प्रा.चा हिस्सा ४९% इतका राहील असे स्पष्ट करण्यात आले. त्यामध्ये अध्यक्ष पदावर म.जी.प्रा. नियुक्त व्यक्ती व व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर Essel Utilities Ltd. नियुक्त व्यक्ती राहील.सबब, या व अशाच प्रकारच्या अन्य ५० शहरांसाठी भागीदारीच्या तत्वावर काम करणे अपेक्षित राहील. असे मा.संचालक मंडळास अवगत करण्यात आले. त्यानुसार या प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्याची विनंती करण्यात आली. सदर प्रस्तावाबाबत चर्चा झाली असता, मा.राज्यमंत्री महोदयांनी Essel Utilities Ltd ह्या कंपनी व्यतिरिक्त इतरही चांगल्या कंपनी सोबत जॉईंट व्हेंचर करता येवू शकेल असे नमूद केले. त्यावर चर्चा होवून सद्यस्थितीत केवळ औरंगाबाद शहराकरिता Essel Utilities Ltd कंपनीसोबत जॉईंट व्हेंचर करणेच्या प्रस्तावास संचालक मंडळाने तत्वतः मंजूरी दिली. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

ठराव :

असा ठराव करण्यांत येतो की, मजीप्रा व Essel Utilities Ltd यांच्यात औरंगाबाद शहर पाणी पुरवठा व्यवस्थेचे संचालन व अनुषंगिक कामांपुरता जॉईंट वेंचर करार करण्यास तत्वत मान्यता देण्यात येत आहे. करारनाम्याचे सर्व तपशील निश्चित करुन पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. याच धर्तीवर अन्य शहरांबाबत अशा स्वरुपाचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास सुयोग्य खाजगी संस्थेबरोबर Joint Venture करार करण्यास तत्वत मान्यता देण्यात येत आहे व पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळीची चर्चा :**

धुळे नगरपरिषदेने तांत्रिक अधिका-यांची मागणी करण्यात आलेली आहे. तसे पत्र मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी दाखविले त्यावर मा.सदस्य सचिव यांनी नगरपालिकेने कर्मचाऱ्यांची संख्या दिलेली नाही. शिवाय नगरपरिषदे मजीप्राचे देणे असलेली रक्कम प्रथम अदा करावी त्यानंतर त्यांच्या मागणीचा विचार करावा असे सूचीत केले त्यास सर्व संचालक मंडळाने मान्यता दिली.

27/12

मा.अध्यक्ष तथा मंत्री
पाणी पुरवठा व स्वच्छता

सदस्य सचिव
म.जी.प्रा.